कामगार विभाग/ब/ककनिस/३०वी बैठक/१००६८
महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ,
प्रकाशगड, प्लॉट नं.जी-९, बांद्रा(पूर्व),
मुंबई-४०० ०५१

दिनांक:२६.२.१९९९

# परिपत्रक

**विषय**:- कर्मचारी कल्याण निधी समिती-
अधिकारी/कर्मचा-यांच्या पाल्यांना देण्यात येणा-या शिष्यवृत्तीसंबंधी.

कर्मचारी कल्याण निधी समितीच्या दिनांक ५.१.९९ रोजी झालेल्या ३०व्या बैठकीत खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आले.

१/- विभागीय मंडळाच्या उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षेत(एच.एस.सी.) उत्तीर्ण होऊन गुणवत्ता यादीत स्थान प्राप्त केलेल्या मंडळाच्या अधिकारी व कर्मचा-यांच्या पाल्यांना रु.२००/- (रु.दोनशे मात्र) प्रतिमाह या दराने १९९८-९९ या वर्षसत्रापासून शिष्यवृत्ती देण्यात यावी.

२/- मंडळाच्या अधिकारी/कर्मचा-यांच्या पाल्यांना माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (एस.एस.सी.) उत्तीर्ण झाल्यानंतर गुणवत्तेनुसार क.क.नि.समिती मार्फत रु.१००/- (रु.शंभर मात्र) प्रतिमाह शिष्यवृत्ती देण्यात येते व हि शिष्यवृत्ती पदवी/पदविका प्राप्त करेपर्यंत अदा करण्यात येते. उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (एच.एस.सी.) उत्तीर्ण होऊन पुढील शिक्षण घेत असताना येणा-या आर्थिक अडचणींचा विचार करुन समितीने माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (एस.एस.सी.) उत्तीर्ण होऊन गुणवत्तेनुसार शिष्यवृत्ती घेत असलेल्या पाल्यांच्या बाबत त्यांनी उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण होऊन पुढील शैक्षणिक सत्रात प्रवेश घेतल्यानंतर त्यांना रु.१००/- ऐवजी रु.२००/- शिष्यवृत्ती अदा करण्यात यावी असे मंजूर केले आहे. या वाढीव शिष्यवृत्तींची अंमलबजावणी सन १९९८-९९ या शैक्षणिक सत्रापासून कार्यान्वित करण्यात यावी. म्हणजेच जे पाल्य १९९८-९९ या वर्षसत्रात बारावीनंतर पुढील शिक्षण घेत आहेत त्यांना हा निर्णय लागू राहील. तसेच ज्या अधिकारी/कर्मचा-यांच्या पाल्यांना १९९८-९९ या वर्षासाठी शिष्यवृत्ती रु.१००/- (रु. शंभर मात्र) प्रतिमाह दराने अदा केली असेल त्या पाल्यांना रु.१००/- (रु.शंभर मात्र) प्रतिमाह वाढीव दराच्या शिष्यवृत्तीच्या फरकाची रक्कम देण्यात यावी.

३/- कर्मचारी कल्याण निधी समितीच्या परिपत्रक क्र.कामगार/ब/ककनिस/२१वी बैठक/२५८९० दि.५.८.१९८९ अन्वये मंडळाच्या अधिकारी/कर्मचा-यांच्या पाल्यास शिष्यवृत्ती मंजूर केल्यानंतर सदरहू शिष्यवृत्ती कालात एखाद्या वर्षी काही विषयात अनुत्तीर्ण झाल्यास त्यास त्या विषयात उत्तीर्ण

होऊन गुणपत्रिका सादर केल्यानंतर शिष्यवृत्ती अदा करण्यात येते. परंतु शैक्षणिक मंडळाच्या नियमाप्रमाणे काही विषयात शिष्यवृत्तीधारक पाल्यास अनुत्तीर्ण होऊन देखिल पुढील शैक्षणिक वर्षात प्रवेश दिला असेल (ए.टी.के.टी.) तर अशा शिष्यवृत्तीधारक पाल्याची शिष्यवृत्ती खंडीत न करता त्यास पुढील शैक्षणिक सत्रात प्रवेश दिला असल्यामुळे शिष्यवृत्ती अदा करण्यात यावी.शैक्षणिक सत्र १९९८-९९ पासून देय शिष्यवृत्तीची रक्कम अदा करण्याची अंमलबजावणी करण्यात यावी.

यापूर्वी क्र.एलआयआर/बी/एसडब्ल्युएफ/१८१९५ दि.३० मार्च १९८५ अन्वये निर्गमित केलेल्या परिपत्रकात नमूद केल्यानुसार स्थानिक पातळीवरील सक्षम अधिका-यांनी या निर्णयाची अंमलबजावणी त्या त्या पातळीवर करावयाची आहे.

सचिव/कर्मचारी कल्याण निधी समिति
व
मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी

प्रति,

१) कार्यकारी अभियंतापर्यंतचे सर्व क्षेत्रिय अधिकारी

२) सर्व क्षेत्रिय उप मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी/ औद्योगिक संबंध अधिकारी/कामगार कल्याण निधी